# जुने लोखंडी कपाटे विक्रीची दरपत्रक सूचना

कार्यकारी अभियंता / प्रनिसं / मुंबई मंडळ, गृहनिर्माण भवन, दुसरा मजला, खोली क्रमांक 318, वांद्रे, पूर्व, मुंबई- 400051 येथील मुख्य प्रशासकीय इमारती मधील व समाज मंदिर हॉल बांद्रा, पूर्व ,येथील जुने लोखंडी कपाटे 'जेथे आहे जसे आहे ' या तत्वावर विक्रीसाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | इसारा रक्कम रु | कोन्या निविदेची रक्कम (विना परतावा रु) (GST सह) | एका कपाटाची न्यूनतम विक्री किमंत रु. (रुपये + GST वगळून) | कोन्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहोर बंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | जुने लोखंडी कपाटांची संख्या (अंदाजे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | म्हाडाच्या मुख्य प्रशासकीय इमारती मधून व समाज मंदिर हॉल बांद्रा पूर्व येथून जुने कपाटे 'जेथे आहे जसे आहे' या तत्वावर विक्री करणे | रु १०,०००/- | रु ५९०/- | रु.११००/- | दि.२१.०७.२०२५ ते दि २५.०७. २०२५ सकाळी १०.०० ते दु. १.०० वाजे पर्यंत | दि.२२.०७.२०२५ ते दि.२८.०७.२०२५ सकाळी १०.०० ते दु. ३.०० वाजे पर्यंत | ६ महिने | २२० |

## दरपत्रके सादर करण्याच्या सर्वसाधारण अटी.

1) दर पत्रकासोबत एजन्सीने इसारा रकमेचा भरणा राष्ट्रीय / शेडयुल बँकेचा रुपये 10,000 (दहा हजार) इतके, मुख्य लेखाधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या नावे काढलेल्या मुदत ठेवीच्या स्वरुपात असावा.
2) दर पत्रकासोबत कंपनीचे / प्रॉपर्टी फर्म / मालकाचे जीएसटी प्रमाणपत्र तसेच पॅन कार्ड आवश्यक आहे.
3) आपली दर पत्रके / देकार प्रपत्र 1 ( Form I ) मध्ये भरून सादर करावीत .
4) ज्या एजन्सीचे दर पत्रक मंजूर होईल त्यांनी साहित्याची पूर्ण रक्कम भरल्यानंतर वरील क्रमांक 1 प्रमाणे जमा मुदत ठेव त्या एजन्सीला परत करण्यात येईल.
5) दरपत्रके सादर करण्यापूर्वी लोखंडी कपाटे इच्छुक दर पत्रक धारकांना ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. दर पत्रक सादर केल्यानंतर कोणत्याही निविदाकाराची / ठेकेदाराचे / खरेदीकाराची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही
6) दर पत्रकामध्ये निविदाकाराने आपला देकार अक्षरी व अंकी लिहिलेला असावा.
7) कोणतीही अट असलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.
8) लखोटा बंद दरपत्रके उपमुख्य अभियंता / प्रनिसं / मुंबई मंडळ कक्ष क्रमांक 318 येथे दि. 22/07/2025 ते 28/7/2025 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत सादर करावे व दर पत्रके सादर केल्याची पोच घ्यावी.
9) शक्य झाल्यास दरपत्रके त्याच दिवशी दिनांक 28/7/2025 रोजी दुपारी 4.00 वाजता दर पत्रक सादर करणारे किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीच्या समोर उघडल्या जातील. शक्य नसल्यास दरपत्रे उघडण्याचा दिनांक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.
10) ज्या एजन्सीच्या नावाने दरपत्रक मंजूर होईल त्यांनी मंजूर देकाराची रक्कम एकरकमी, मंजुरी आदेश मिळताच 10 दिवसाच्या आत डीडी स्वरूपात जमा करणे बंधनकारक राहील अन्यथा इसारा रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

11) मंजूर एजन्सीने रक्कम भरणा केल्यापासून 3 दिवसाच्या आत लोखंडी कपाटे कार्यालयीन जागेमधून उचलणे बंधनकारक राहील अन्यथा सदर लोखंडी कपाटाची जबाबदारी म्हाडाची राहणार नाही. त्या नंतर होणाऱ्या विलंबास रुपये 500/- एवढा प्रतिदिन दंड आकारण्यात येईल.

12) सदरचे जुने लोखंडी कपाटे करिता दरपत्रका मध्ये सादर करण्यात येणारा देकार हा एका कपाटा करिता असून तोच देकार सर्व कपाटांना ग्राह्य धरला जाईल (जीएसटी व्यतिरीक्त). सदर व्यवहारा मध्ये भरावा लागणारा जीएसटी एजन्सीने स्वतः भरावयचा आहे.

13) वर निर्देशित केलेल्या दिनांका नंतर सादर होणारे दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.

14) लोखंडी कपाटे उचलताना त्यावरील लोडिंग / अनलोडिंग / जकात / वाहतूक / विक्रीकर हा सर्व खर्च कपाटे घेणाऱ्या एजन्सीने स्वतः करावयाचा आहे.

15) मंजूर एजन्सीने रुपये 500/- स्टॅम्प पेपरवर कार्यालयाशी करारबध्द होणे आवश्यक आहे. स्टॅम्प पेपरचा खर्च एजन्सीने करावयाचा आहे.

16) दर पत्रकामध्ये देकार लिहिताना प्रत्येक दुरुस्तीच्या ठिकाणी एजन्सीने आपल्या सहीचे अद्याक्षरे व मोहोर उठवावी. देकारामधील अंकामध्ये काही दुरुस्ती असल्यास अक्षरा मध्ये लिहिलेला देकार अंतिम समजण्यात येईल.

17) ज्या एजन्सीचे दर मंजूर होतील त्यांनी स्वखर्चाने जुने लोखंडी कपाटे 'जेथे आहे जसे आहे ' या तत्वावर उचलावे.

18) कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

19) जुने लोखंडी कपाटांची संख्या कमी किवा जास्त होऊ शकते. कार्यालयातील कपाटे जशी रिकामे होतील तशी कपाटाची रक्कम भरून टप्प्या टप्याने घेऊन जाणे आवश्यक असल्यामुळे या कार्यादेशाची मुदत 6 महिने वैध असेल.

20) दरपत्रका मध्ये न्यूनतम एका कपाटाच्या विक्री किमतीपेक्षा म्हणजेच रु.1100/- पेक्षा कमी किमंत भरू नये, कमी भरलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

कार्यकारी अभियंता
प्रनिसं/मुंबई मंडळ